--------------------------------------------------------------------------------------------

# लेखन : स्व-अभिव्यक्ती

**वर्णन**

१) वेगवेगळ्या माणसांच्या स्वभावाचे वर्णन करणारी दहा वाक्ये लिही.
२) मावशीच्या तान्ह्या बाळाचे वर्णन लिही.
३) गावच्या आठवडा बाजाराचे वर्णन लिही.
४) तुमच्या वर्गाच्या खिडकीतून दिसणाऱ्या दृष्याचे वर्णन लिही.

**कल्पनेवर आधारित लेखन**

१) बाहुली बोलत आहे अशी कल्पना करून दहा वाक्ये लिही.
२) तुला एका दिवसासाठी शाळेचे मुख्याध्यापक केले तर त्या दिवसभरात तू काय काय करशील?
३) तुमच्या गावचा ओढा बोलू लागला तर तो तुला काय काय सांगेल?

**संवाद**

१) एक मुलगा कुत्र्याला दगड मारत होता. हे पाहिल्यावर तू त्याला काय सांगशील? तो मुलगा आणि तू यांच्यात झालेला झालेला संवाद लिही.
२) आजारी पडलेला संदीप बरा होऊन हॉस्पिटलमधून घरी निघाला आहे. डॉक्टर आणि संदीप यांच्यातील संवाद लिही.
३) एक मुलगा रांगेत मध्येच घुसला तर बाकीची मुले त्याला काय सांगतील? तो काय म्हणेल? मुलामुलांमधील संवाद लिही.

**मुलाखत**

१) एस. टी. ड्रायव्हरची मुलाखत घेऊन ये. ती तुझ्या शब्दांत लिही.
२) आजीची किंवा आजोबांची मुलाखत घे. त्यांच्या लहानपणीच्या आठवणींविषयी विचार. त्या तुझ्या शब्दांत लिही.

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद

(विद्या परिषद)

इयत्ता : सातवी

---

**पत्रलेखन**

१) गावात कधीही न आलेल्या शहरातील मुलांना पत्र लिहून तुझ्या घराबद्दल आणि गावाबद्दल कळव.

२) शहरात कधीही न आलेल्या गावातील मुलांना पत्र लिहून रेल्वे स्थानकाबद्दल माहिती दे.

३) काकाच्या बाळाच्या बारशासाठी पत्र लिहून दुसऱ्या गावात राहणाऱ्या आत्याला बोलावून घे.

**वैचारिक लेखन**

१) इंग्रजी माध्यमाच्या शाळेत जाणारी मुले मराठी शाळांमधील मुलांना कमी लेखतात हे योग्य की आयोग्य? याबद्दल सविस्तर लिही.

२) कुटुंबातील पुरुषांची जेवणे झाल्याशिवाय स्त्रिया जेवत नाहीत. शिळे अन्न नेहमी स्त्रियाच संपवतात. याविषयी तुला काय वाटते ते सविस्तर लिही.

**अनुभव लेखन**

१) पावसाळा सुरू होण्याआधीच्या वातावरणाबद्दल लिही.

२) शाळेचा पहिला दिवस.

३) आरशात पहा आणि तुला स्वतःकडे पाहून काय काय वाटले ते लिही.

४) तुम्हा मित्रांचे भांडण कशावरून झाले आणि ते कसे मिटले? ते लिही.